## दिनांक 13/03/2025

1 खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 12:00 वा क ह्या सुमारस मौजे हाळ खुर्द ते हाळ बुद्रुक सागर कॅफे हॉटेलच्या बाजुच्या रोडवर येथे 03 आरोपीत आपसांत संगणमत त्यांचे ताब्यातील दोन काळया रंगाचे बैल ( गोवंशीय जनावरे) उभे राहण्यास पुरेशी हवा ,चारापाणी ,दवाउपचाराची साधने ,तसेच पुरेशी जागा नसताना दाटीवाटीने उभे करुन बांधुन त्याची कत्तल करण्याचे उददेशाने वाहतुक करीत असताना मिळुन आले म्हणुन त्यांना फिर्यादी व साक्षीदार विचारपुस करीत असल्याचा राग मनात धरुन आरोपी नं.03 याने तेथे जावुन फिर्यादी व साक्षीदार याना ठार मारु अशी दमदाटी केली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं 83/2025, भारतीय न्याय संहीता 352,351(2),3(5) ,सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 चे कलम 5(अ),5(ब) चे उल्लंघन कलम 9 सह प्राण्यांना क्रुरतेनेवागविण्यास प्रतिबंधअधिनियम 1960 चे कलम 11(1),घ,ड,ज सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 119 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/रोहिदास भोर हे करीत आहेत.

2. रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 15:30 वा च्या सुमारास मौजे महिला फिर्यादी यांच्या बिल्डींगच्या टेरेसवर कपडे वाळत टाकत असताना फिर्यादी या त्यांचे बिल्डींगच्या टेरेसवर कपडे वाळत घालण्याकरीता गेले असता त्या कपडे वाळत टाकत असताना त्यांचे समोरील श्री.प्लाझा बिल्डींगमध्ये दुस-या मजल्यावरील रूम नं.02 मध्ये राहणारा आरोपी यांने खिडकीतून फिर्यादी यांस अंगप्रदर्शन अश्लील हावभाव करून फिर्यादी यांच्या मनास लज्जा उत्पन होईल असे वर्तन केले.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.50/2025, भारतीय न्याय संहिता कलम 74 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/साळुंखे हे करीत आहेत.

3. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 03:00 वा च्या सुमारास मौजे बल्लाळेश्वर मंदीर परीसरात दर्शन रागेत, सुधागड येथे महिला फिर्यादी हया त्यांचे नाते वाईकासह बल्लाळेश्वर मंदीरात दर्शन घेत असताना त्यांचे कडील लेडीज पर्स मधून एकूण 3,21,000/-रुपये किमतीचे दोन सोन्याचे मंगळसुत्र व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे परवानगीशिवाय स्वत:चे फायदे करीता लबाडीच्या ईरादयाने त्यांचे हॅन्ड पर्सला कठ मारून

चोरी केली.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.22/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पवार हे करीत आहेत.

4. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 18:00 वा च्या सुमारास मौजे तुपगाव गावचे हददीत चौक लोहप रोडवर मंगल्य बिल्डींग समोर ता.खालापुर येथे आरोपीत हा त्याच्या ताब्यातील निळया रंगाची प्लसर मोटार सायकल ही चौक लोहोप रोडने लोहोप बाजुकडे स्वत: चालवित घेवुन जात असताना अपघात ठिकाणी आलेवेळी आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने निष्काळजीपणे बेदगारपणे अतिवेगाने चालवुन चौक लोहोप रोडने पायी चालत जात असनारा जखमी मुलगा कनिश जयवंत वाडेकर वय 08 वर्षे यास ठोकर लागुन अपघात होवुन अपघातामध्ये जखमी मुलगा याचे लहान मोटया गंभीर स्वररुपाचे दुखापतीस कारणीभुत होवुन अपघाताची खबर न देता पळुन गेला

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.86/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 134,184, भारतीय न्याय संहिता 281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सुरेश बोडके हे करीत आहेत.

5. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 14:45 वा च्या सुमारास मौजे पाचगणी ठाकुरवाडी ता.पेण येथे 02 आरोपीत हे महिला फिर्यादी यांचे घरासमोर येवुन आरोपीत नं.01 या फिर्यादी यांना म्हणाली की, माझे नव-याला तुम्ही लपवुन ठेवलाय दुस-या बाईच्या नादाला लावलात तुम्ही त्याला लवकर घेंवुन या असे बोलुन शिवीगाळी करून दमदाटी केली. तसेच बाजुलाच असलेले दोन लाकडी दांडके आरोपीत यांनी संगणमत करून त्यांच्या हातात घेवुन आरोपीत नं.01 हिने फिर्यादी यांच्या उजव्या हाताचे मनगटावर लाकडी दांडक्यानें मारहाण केली. तसेच आरोपीत नं.02 याने त्याच्या हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादी यांचे पती याचे डोक्यावर मारहाण केली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.40/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 318(4), 352, 351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/माने हे करीत आहेत.

6. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे नेरळ बाजारपेठ, कर्जत येथे महिला फिर्यादी यांनी आरोपीत रा.कर्जत यास मदत म्हणुन दिलेले पैस फिर्यादी या परत मागण्याकरीता गेल्या असता आरोपीत याने फिर्यादी यांना शिवीगाळी करुन सारखी पैसे मागायला का येते असे बोलुन लाकडी दांडक्याने फिर्यादी यांचे डावे हाताचे कोपरावर व पाठिवर उपटी मारुन दुखापत केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.42/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/गुजराथी हे करीत आहेत.

7. रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 12:45 वा च्या सुमारास मौजे रोहा बसस्थानक येथे रोहा- मुरूड बस मध्ये चढता रोहा येथे महिला फिर्यादी हया रोहा बसस्थानक येथे रोहा- मुरूड एस-टी बस मध्ये चढत असताना प्रवाश्यांच्या गर्दीचा फायदा घेवून कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीच्या उह्देश्याने फिर्यादी व साक्षीदार यांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण1,35,000/-रुपये किमतीची माल त्यांचे संमतीशिवाय चोरून नेला.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.51/2025, भा.न्या.सं कलम 303 (2 प्रमाणे 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/खतीप हे करीत आहेत.

8. कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 16:45 वा ते दि.10/03/2025 रोजी 16:45 वा च्या दरम्यान मौजे सुदर्शन कॉलनी ते आंबेवाडी एस टी स्टॅण्ड येथे बसमध्ये चढता वेळी फिर्यादी रा.खेद रत्नागिरी व त्यांचे पत्नी हे मौजे सुदर्शन कॉलनी रोठ ता.रोहा येथे वटभरणीचे कार्यक्रमाकरीता आले असता फिर्यादी व त्यांच्या पत्नी हे आपले मुळ गांवी खेड येथे जाणेकरीता आंबेवाडी नाका कोलाड येथेआले असता ठाणे खेड एस टी बस मध्ये चढतावेळी कोणीतरी अज्ञात इसमांनी त्याचे पाठीवरील सॅगची चैन उघडुन सॅगबॅगमधील एकूण 1,90,000/-रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसुत्र व ब्रेसलेट असलेला लाल रंगाचा बॉक्स फिर्यादी यांचे संमतीशिवाय अज्ञात चोरटयांनी त्यांच्या आर्थिक फायदयाकरीता चोरून नेले.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं.25/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/चौधरी हे करीत आहेत.

9. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 04/03/2025 रोजी 14:00 वा ते दि. 12/03/2025 रोजी 14:00 वा च्या दरम्यान मौजे अॅटल्स बिल्डींग रूम नं.2701 हिरीनंदानी सोसायटी, पनवेल फिर्यादी हया हिरीनंदानी फॉरच्युन सिटी मध्ये राहतात तसेच साफसफाईचे काम करतात यातील आरोपी हा.अॅटल्स सोसायटी मध्ये राहणारा असून आरोपी याने फिर्यादी यांना घरकामासाठी त्याचे घरी बोलावुन घरकाम झाल्यानंतर परत बेडरूममधील बाथरूम साफ करायला लावुन त्यावेळी मै आपको 1000/- रूपये दुंगा असे बोलुन फिर्यादीच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.60/2025, बी.एन.एस.75(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/ढोणे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 12.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 222 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,32,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.